**'लक्ष्मी मुक्ती' – मालमत्तेमध्ये महिलांचा हिस्सा**
**७/१२ उताऱ्यास पुरूषाबरोबर स्त्रियांच्या मालकी हक्काची नोंद होणे बाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**परिपत्रक क्र. एस-१४/२१६१८१६/प्र.क्र. ४५८/ ल -६.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक १५ सप्टेंबर, १९९२.**

परिपत्रक

स्त्रियांचे हक्क सुरक्षित रहावे या दृष्टिने काही सामाजिक संघटनांनी सूचविल्याप्रमाणे शासन सर्व संबंधितांना असे आदेश देत आहे की, एखाद्या व्यक्तीने आपल्या स्वत:च्या जमिनीत आपल्या कायदेशीर पत्नीच्या नावाचा ७/१२ च्या उताऱ्यात स्वत:बरोबर सहहिस्सेदार म्हणून नोंद घ्यावी, अशी स्वेच्छेने विनंती केल्यास, महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ मधील कलमांच्या अधीन राहून फेरफार नोंदीबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण करून तशी नोंद घेण्यास हरकत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/-
(व.ल. गवई)
उपसचिव
महसूल वन विभाग